महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १२२ /२०२३ — दि. २४/०८/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** दिनांक ३०/०८/२०२३ रोजी **"नारळी पोर्णिमा"** सणानिमीत्त ठाणे शहरात कळवा खाडीवरील पुल परिसरात ( कोर्टनाका ते क्रिक नाका व शिवाजी चौक) नारळी पोर्णिमेच्या दिवशी ठाणे शहरातील नागरिक कळवा खाडीमध्ये नारळ टाकण्यासाठी मोठया संखेने उपस्थित राहतात. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** १) कळवा क्रिक नाका बाजुकडुन उर्जिता हॉटेल मार्गे पोलीस कवायत मैदाना समोरील रोडने कोर्टनाक्याकडे जाणा–या व सिडको स्टॅन्ड कडे जाणा–या वाहनांना उर्जिता हॉटेल येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने हि क्रिकनाका – उर्जिता हॉटेल येथून उजवे वळण घेवून कारागृह वसाहत बाजुकडून, आर.टी.ओ. कार्यालयाचे समोरुन जी.पी.ओ.येथुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) सिडको कडून क्रिकनाक्याकडे येणा–या वाहनांना पारेख ट्रान्सपोर्ट येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने फ्लाय ओव्हर ब्रिज वरून कळवा नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच साकेत रोडने जाणारी वाहने पारेख ट्रान्सपोर्ट येथुन डावीकडे वळुन ठाणे पोलीस स्कुल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) साकेत रोडने सिडकोकडे जाणा–या टी.एम.टी, एन.एन.एम.टी.बसेस (पुर्णा व पंचगंगा) यांना क्रिकनाका कडे जाण्यास राबोडी वाहतुक उपविभाग कार्यालयासमोर "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने साकेत रोडने सिडको कडे जाणा–या टी.एम.टी.बसेस हया क्रिकनाका येथे न येता राबोडी वाहतुक उप विभाग कार्यालय समोरून युटर्न घेवून पुन्हा साकेत मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ४) खारकर आळी कडुन व महागिरी कडुन पारेख ट्रान्सपोर्ट कडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना ठाणे पोलीस स्कुल येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ठाणे पोलीस स्कुल येथुन सरळ कोर्टनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ५) नवी मुंबई कडुन विटावा मार्गे कळवा कडे येणारी जड अवजड वाहने, सहा चाकी वाहने, मालवाहतुक वाहने नवी मुंबई परिवहन बसेस व खाजगी बसेसना ग्रीन वर्ल्ड, पटनी येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ग्रीन वर्ल्ड पटणी येथुन डाव्या बाजुला वळण घेवुन ऐरोली खाडी ब्रिज मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ६) मुंब्रा, पारसिक सर्कल कडुन कळवा खाडी ब्रिजकडे येणारी जड अवजड वाहने, सहा चाकी वाहने, मालवाहतुक वाहने ठामपा परिवहन बसेस व खाजगी बसेसना पारसिक सर्कल येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने पारसिक सर्कल – गॅमन – खारेगांव टोलनाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ७) ठाणे शहरातून कळवा पुल मार्गे नवी मुंबईकडे जाणा–या सर्व प्रकाराच्या लक्झरी बसेस, एस.टी बसेस व खाजगी कंपनीच्या बसेस यांना कॅडबरी सिग्नल, खोपट येथुन "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) सदरच्या सर्व प्रकारच्या लक्झरी बसेस, एस टी बसेस व खाजगी, कंपनी बसेस या पुर्व द्रुतगती मार्गे (हायवे) रोडने कॅडबरी सिग्नल, कोपरी ब्रिज मुलुंड टोलनाका ऐरोली ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदरच्या सर्व प्रकारच्या लक्झरी बसेस, एस टी बसेस व खाजगी, कंपनी बसेस या पुर्व द्रुतगती मार्गे (हायवे) रोडने गोल्डन डाईज नाका – खारेगांव टोल नाका – पारसिक नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ८) गोल्डन डाईज नाक्याकडुन जीपीओ मार्गे क्रिकनाक्याकडे जाणा–या चारचाकी व त्यावरील चाके असलेल्या सर्व प्रकारच्या मालवाहतुक वाहनांना गोल्डन डाईज नाका येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) गोल्डन डाईज नाक्याकडुन क्रिकनाक्याकडे येणा–या कंपनी बसेस या गोल्डन डाईज–क्रिक नाक्याकडे न जाता

CamScanner

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

सदरची अधिसुचना दिनांक ३०/०८/२०२३ रोजी सकाळी १२.०० ते २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे/नवी मुंबई
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१, ठाणे, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, नवी मुंबई

प्रत कार्यवाहीसाठी :—

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे./नवी मुंबई
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका, ठाणे,/नवी मुंबई/बृहन्मंबई
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/नवी मुंबई

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, राबोडी, कापुरबावडी, कळवा वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner